सर्वात आनंदी, उत्साह निर्माण करणारा गणेशोत्सव  आता थोड्याच दिवसात  सुरु होणार . गणपती बाप्पचे आगमन् ढोल ताश्यांच्या गजरात होणार पण ह्या उत्सहाच्या नादात आपण पर्यावरणाचे भान पण ठेवले पाहीजे. कर्णकर्कष्य आवाजाने होणारे ध्वनि प्रदुषण पण रोखले पाहिजे. आपल्या आजुबाजूला वृद्ध अथवा आजारी व्यक्ति असतात त्याना  ह्या आवाजाचा त्रास होऊ शकतो ह्याची काळजी पण आपण घेतली पाहिजे. आजकाल POP च्या मूर्ति बनविल्या जातात त्याचे विसर्जन विहिर,नदी, खाडी, समुद्र ह्यात केले जाते पण त्याचे विघटन होते का तर  नाही उलट आपण भक्तिभावाने पूजा केलेल्या गणपतीचे तुटलेले  अवशेष दुसऱ्या दिवशी काठावर पडलेले दिसतात , ते बघून मन खिन्न होते . POP मुळे जलप्रदूषण सुद्धा होते. तसेच सजावटीसाठी आपण थर्माकोल ,प्लॅस्टिक  वापरतो त्याचेही विघटन होत नाही. म्हणजे आपल्या आनंदासाठी आपणच आपल्या निसर्गाचा ऱ्हास करतोय

हा सगळा ऱ्हास थांबवणे हे आपल्या सारख्या जागरूक नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे. म्हणूनच आपण इको - फ्रेंडली गणेशोत्सवाची सुरुवात करूया.

इको - फ्रेंडली गणेशोत्सव म्हणजे काय  तर प्रत्येकाने घरात शाडूच्या मातीची मूर्ती स्थापन करूया . ह्या मातीचे विघटन लवकर होते . तसेच हि माती पुन्हा गणपती  बनविण्यासाठी उपयोगी पडते. सजावटीसाठी थर्माकोल, प्लॅस्टिक ह्यांचा वापर न करता ताजी फुले, पेपर वापरून सजावट करावी. घरातील काही टाकाऊ वस्तू वापरून सुद्धा छान आरास करता येईल. निर्माल्य पाण्यात न टाकता खत प्रकल्पांसाठी द्यावे. तसेच प्रसादासाठी पेपर डीश वापराव्यात, ग्लास सुद्धा प्लास्टिकचे वापरू नयेत .

काळाप्रमाणे आपणही बदलणे खूप आवश्यक आहे

चला तर मग ..........

गणपती बाप्पा मोरया
पर्यावरण जागृतीची सुरुवात करूया

आपल्या देशाची भावी पिढी आपणच  घडवली पाहिजे. भावी पिढी म्हणजे आपली बच्चे कंपनी हो. त्यांच्यात  आत्तापासूनच पर्यावरण जपण्याची नीव आपण रोवली पाहिजे.

त्यामुळे इको फ्रेंडली सर्वोदय नगर ग्रुप ने ह्यावेळेला एक स्पर्धा आयोजित केली आहे आणि ह्याचे परीक्षक असणार आहेत आपली भावी पिढी. हि छोटी मुले आपल्या घरी येऊन परीक्षण करतील. ह्या स्पर्धेतून तीन नंबर काढले जातील .

## स्पर्धेचे नियम खालील प्रमाणे असतील

१.  गणेशाची मूर्ती हि शाडूच्या मातीची असावी

२. थर्माकोल , प्लॅस्टिक चा वापर सजावटीसाठी  नसावा. तसेच प्रसाद आणि पाणी ह्यासाठी  सुद्धा नसावा.

३. माती , वाळू, कापड,लाकडी वस्तू , मेटल, पेपर, पुठ्ठे ह्यांपासून आकर्षक देखावे असावेत.

४. घरातील टाकाऊ पासून टिकाऊ वस्तूंचा वापर सुद्धा सजावटी साठी करू शकता.